# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन, आकुर्डी, पुणे-४४

दुरध्वनी क्र. ०२०-२७६५२९३४/३५

-----------------------------------------------------------------------------------------

## ई-निविदा सुचना क्र.१ सन २०१८-२०१९

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे -४४ खालील कामाकरिता नोंदणीकृत अनुभवी जाहिरात एजन्सी कडुन ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | एक वर्षाचा अंदाजीत रु.(Estimated Cost) | बयाणा रक्कम रु. | निविदा कालावधी | ई-निविदा फॉर्म फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | जाहिरात एजन्सी नेमणूक | ५० लाख | ५० हजार | १ वर्षे | ५००/- + GST |

| | |
|---|---|
| Online निविदा खरेदी व तयारीचा कालावधी | दि.०६/०६/२०१८ वेळ १०.०० पासुन ते दि.२७/०६/२०१८रोजी १७.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक | दि. १५/०६/२०१८ वेळ दुपारी ३.०० वा. ठिकाण मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे -४४ |
| Online निविदा बंद होण्याची वेळ | दि. २७/०६/२०१८ रोजी १७.०० पर्यंत |
| निविदा सादर करण्याचा कालावधी Submission | दि. ०६/०६/२०१८ वेळ १०.०० पासुन ते दि.२७/०६/२०१८ रोजी १७.०० पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. २८/०६/२०१८ वेळ दुपारी १५.०० वा. |

**टिप** :-१) ई-निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या www.pcntda.org.in or www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) निविदेबाबतचे पुरवणी किंवा शुध्दीपत्रक हे वेब साईट वरच प्रसिध्द केले जाईल. यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात दिली जाणार नाही

सही/--

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

C:\Users\pro-sable\Desktop\जाहिरात एजन्सी नेमणेबाबत.docx

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,आकुर्डी,पुणे-44.

जाहिरात एजन्सी नेमणेबाबत

अटी – शर्ती व नियम

१) निविदेची फॉर्म फी रु.५००/- + GST, १% बयाणा रक्कम E-Payment व्दारे egatewaymode व्दारे www.mahatenders.gov.in वेबसाईट वरील सुचनेप्रमाणे जमा करावी.

२) यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्या अगोदर २% सुरक्षा अनामत रक्कम डी.डी व्दारे कार्यालयाकडे जमा करावी लागेल.

३) यशस्वी निविदाधारकाने भरलेली बयाणा रक्कम त्यांच्या इच्छेनुसार सुरक्षा अनामत रकमेत रुपांतरीत करु शकेल अन्यथा बयाणा रक्कम ही, पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम भरलेनंतर परत करण्यात येईल.

४) जाहिरात एजन्सीची निविदा मंजुर झाल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीसाठी जाहिरात एजन्सीची नेमणूक करण्यात येईल. प्रथम १ वर्षासाठी कार्यादेश देण्यात देण्यात येईल. त्यानंतर काम समाधानकारक असल्यास पुढील १ वर्षासाठी कार्यादेश देण्यात येईल. तसेच नियम व अटी/शर्तीचा भंग झाल्यास त्याबाबत नोटीस देऊन मुदतपूर्व निविदा रद्द करण्यात येईल.

५) जाहिरात एजन्सीचे मुख्यालय किंवा शाखा कार्यालय हे पुणे किंवा पिंपरी चिंचवड येथे असणे आवश्यक आहे.

६) लिफाफा क्र. २ व्यापारी / दराचा लिफाफा यामध्ये निविदाधारकाने (जाहिरात एजन्सी) वर्तमान पत्राने दिलेल्या जाहिरातीच्या शासकीय दरावर व नियमित (कमर्शियल) दरावर देण्यात येणारी सूट / सवलत टक्केवारीमध्ये नमूद करावी.

७) वर्तमान पत्राने जाहिरातीच्या दिलेल्या देयकातून सूट वजा जाता उर्वरीत रक्कम जाहिरात एजन्सीला देण्यात येईल. यावर शासन नियमाप्रमाणे फक्त वस्तु व सेवाकर वेगळा देण्यात येईल इतर कोणताही कर देण्यात येणार नाही.

८) एजन्सीने कार्यालयाने दिलेल्या नमुन्यातील साईजप्रमाणे जागेत आकर्षक स्वरुपात जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. काही वेळा जाहिरात होण्यासाठी विविध डिझाईन्स तयार करावी लागतील. त्याबाबतच्या आकारणीचा स्पष्ट उल्लेख निविदाधारकाने नमूद करावा.

९) कार्यालयाने दिलेल्या तपशीलाप्रमाणे आणि दिलेल्या कालावधीत तसेच काही वेळा नमूद केलेल्या दिवशीच जाहिरात प्रसिध्द होणे आवश्यक आहे. जर अशी जाहिरात प्रसिध्द न झाल्यास एजन्सी दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. हा दंड दिलेल्या कालावधीनंतरच्या दिनांकापासून प्रतिदिन रु.५००/- एवढा राहील.

१०) जाहिरातीचा कार्यालयाने दिलेला मजकूर आणि प्रसिध्द झालेला मजकूर (काही वेळा आकडेवारी) यात कोणत्याही स्वरुपाची तफावत झाल्यास त्याला एजन्सी जबाबदार असून "चुकीची दुरुस्ती" ची प्रसिध्दी एजन्सीने विनामुल्य करावयाची आहे.

११) ज्या दिवशी जाहिरात प्रसिध्द होईल त्याच दिवशी ज्या ज्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द होणार आहे त्या वृत्तपत्रांच्या प्रत्येकी तीन तीन प्रती कार्यालयाचे अवलोकनार्थ पाठवाव्यात.

१२) जाहिरात एजन्सीची सरासरी वार्षिक उलाढाल (Turn over) अंदाजित रकमेच्या किमान ३०% असणे आवश्यक आहे.

१३) जाहिरातीसाठीच्या अंतर्भुत रकमेनुसार जाहिरात दरामध्ये बदल करता येणार नाही.

निविदा स्विकृती दोन लिफाफ्यात करण्यात येईल.

१) लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा :-

 १) फॉर्म फी e payment egatewaymode व्दारे

२) बयाणा रक्कम e payment egatewaymode व्दारे

३) इंडियन न्यूजपेपर सोसायटीचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

४) शासकीय व निमशासकीय महामंडळ, प्राधिकरण इ. कार्यालयात किमान पाच वर्षे जाहिरात प्रसिध्दीचा अनुभव असल्याबाबतच्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत

५) वित्तीय वर्ष सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षाचे आयकर रिटर्न

६) वित्तीय वर्ष सन २०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८या तीन वर्षाचे नफा तोटा किंवा आय-व्यय प्रपत्र

७) वस्तु व सेवाकर रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

८) हमीपत्र

आवश्यक वाटल्यास हया कागदपत्रांची मुळ प्रत पाहण्यासाठी प्राधिकरण कार्यालयाने मागितल्यास ती सादर करावी लागेल.

२) लिफाफा क्र.१ व्यापारी / दराचा लिफाफा

१४) लिफाफा क्र.१ मध्ये आवश्यक कागदपत्रे व अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या पात्र निविदाधारकाचेच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

१५) एजन्सी निश्चित झाल्यावर भरलेल्या बयाणा रकमेचे अनामत रकमेत रुपांतर करण्यात येईल.

१४) निविदा मंजुर झाल्यानंतर एजन्सीला रु.१५१००/- चे स्टँम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल. करारनाम्यासाठी लागणारा खर्च एजन्सीला करावा लागेल.

१५) कोणतेही कारण न देता निविदा मंजूर करण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

१६) वरीलप्रमाणे अटी – शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधनकार आहेत. याबाबतचे हमीपत्र तांत्रिक लिफाफ्यात अ.क्र. ८ वर भरुन Uploaded करावे.

निविदाधारकाचे स्वाक्षरी

निविदाधारकाने नाव व पत्ता

दुरध्वनी क्रमांक

जनसंपर्क व प्रसिध्दी अधिकारी

लेखा अधिकारी

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# **पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,आकुर्डी,पुणे-44.**

निविदा प्रपत्र – व्यापारी / दराचे प्रपत्र

| अ.क्र | कामाचे वर्णन | जाहिरात एजन्सीमार्फेत देण्यात येणारी सवलत (Discount) % |
|---|---|---|
| १) | शासनमान्य दराने (शासकीय दराने) प्रसिध्द करावयाची जाहिरात | |
| २) | नियमित दराने (कमर्शिअल दराने) प्रसिध्द करावयाची जाहिरात | |

टीप :- एकूण देय रकमेवर discount वजा जाता येणाऱ्या रकमेवर नियमाप्रमाणे वस्तु व सेवाकर कार्यालयाकडून देण्यात येईल.

निविदाधारकाची स्वाक्षरी – जनसंपर्क व प्रसिध्दी अधिकारी

निविदाधारकाने नाव व पत्ता – मुख्य लेखा व वित्त अधिकारी

दुरध्वनी क्रमांक –

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# **हमीपत्र**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी पुणे – ४४ यांनी जाहिरात एजन्सी नेमणूकीसाठी मागविलेल्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

दिनांक –

ठिकाण –

स्वाक्षरी –

निविदाधारकाचे नाव –

पत्ता –

दुरध्वनी क्रमांक –

-----------------------------------------------------------------------------------------------

(टिप:- सदरील हमी पत्र तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र ८ साठी जोडावयाचे आहे.)